RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २(६)] शुक्रवार, मार्च ७, २०२५/फाल्गुन १६, शके १९४६ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **७ मार्च, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. IX OF 2025**

A BILL

TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND HOARDINGS WHICH TEND TO INSTIGATE VIOLENCE OR SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.**

**महाराष्ट्र राज्यात हिंसाचारास व लैंगिक अपराधांस प्रवृत करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** मासिके, नियतकालिके या मधील फायदा मिळविण्यास प्रवृत करणाऱ्या जाहिराती आणि प्राणघातक शस्त्रे उदा. पिस्तुले,बंदुका,चाकू,रामपूरी चाकू व भाले यांसारख्या प्राणघातक शस्त्रांसह हावभाव चित्रित करणारे भडक रंगात रंगवलेले जाहिरात फलक त्याचप्रमाणे स्त्रीदेहांचे प्रदर्शन करणारी व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणारी चित्रे, ही परिणामी एका बाजूने खून, दरोडे, दंगली अशा अपराधांना चिथावणी देत

आहेत आणि दूसऱ्या बाजूने महिलांची टिंगल-टवाळी करण्यास, महिलांवर बलात्कार आणि अन्य लैंगिक अपराध करण्यास प्रेरणा देत आहेत;

आणि ज्याअर्थी, सध्याच्या कायदेशीर उपाययोजनांच्या आधारे अशा जाहिरातींवर बंदी घालणे शक्य झालेले नाही;

आणि ज्याअर्थी, आता, महाराष्ट्र राज्यात अशा जाहिरातींवर बंदी आणणे इष्ट व उचित आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो संपुर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसुचनेद्वारे निश्चित करील त्या तारखेस अमंलात येईल.

विवक्षित जाहिराती व जाहिरात-फलक यांवर बंदी घालणे.

**२.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अशा जाहिरातीमध्ये समाविष्ट केलेला किंवा अंतर्भुत केलेला मजकूर, जे लोक वाचण्याचा, पाहण्याचा संभव असेल किंवा असा मजकूर ज्याच्या कानावर पडण्याचा संभव असेल अशा व्यक्तींच्या लैंगिक प्रवृत्ती ज्या मजकुरामुळे किंवा हावभावामुळे उद्दिपित होऊ शकतील किंवा ज्यामुळे त्यांच्या प्रक्षोभक भावनांना चिथावणी मिळू शकेल असा मजकूर किंवा हावभाव यांचा समावेश असलेल्या जाहिराती व जाहिराती-फलक लावणाऱ्यावर याद्वारे बंदी घालण्यात येत आहे.

(२) जो कोणी,

(अ) पोट-कलम (१) अन्वये बंदी घातलेले कोणतेही पत्रक, वृतपत्र, रेखचित्र, रंगचित्र किंवा आकृती किंवा इतर कोणतीही वस्तू यांचे जाहीरपणे प्रदर्शन करील, विक्री करील, भाडयाने देईल, वितरित करील किंवा ते कोणत्याही मार्गाने प्रसृत करील किंवा ते विकणे, भाडयाने देणे, त्यांचे वितरण करणे, जाहिर प्रदर्शन करणे किंवा ते प्रसृत करणे यांच्या प्रयोजनासाठी अशी वस्तू तयार करील, तिचे उत्पादन करील किंवा तो स्वतःच्या ताब्यात ठेवील, किंवा

(ब) जो कोणताही धंदा करीत असताना त्यास हे माहित असेल किंवा माहित असण्यास कारण असेल की, कोणत्याही अशा बंदी घातलेल्या गोष्टी या उपरोक्त पैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येत आहेत, निर्माण करण्यात येत आहेत, खरेदी करण्यात येत आहेत, ठेवण्यात येत आहेत, उघडपणे वाहून नेण्यात येत आहेत, प्रदर्शित करण्यात येत आहेत किंवा कोणत्याही रीतीने प्रसृत करण्यात येत आहे, अशा धंद्यात सहभागी होत असेल किंवा त्यातून नफा मिळवित असेल, किंवा

(३) या अधिनियमान्वये बंदी घातलेली कोणती कृती करण्याचे कबूल करील किंवा ती करण्याचा प्रयत्न करील —

अशा व्यक्तीस पहिला गुन्हा घडल्यानंतर दोन वर्षापर्यंत असू शकेल एवढया कालावधीसाठी कारावासाची आणि दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या गुन्हासाठी पाच वर्षापर्यंत असू शकेल एवढी कारावासाची तसेच पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया दंडाची शिक्षा देण्यात येईल.

दखलपात्र अपराध.

**३.** कलम २ अन्वये शिक्षापात्र अपराध दखलपात्र असतील.

सद्‌भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

**४.** या अधिनियमान्वये सद्‌भावनेने कोणतीही गोष्ट करणाऱ्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही व्यक्तींवर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई करण्यात येणार नाही.

**५.** ( १ ) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी **शासकीय राजपत्रात** अगोदर प्रकाशित करण्याच्या शर्तीच्या अधीन राहून नियम करील. नियम तयार करण्याचा अधिकार.

( २ ) ह्या अधिनियमांन्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

सध्या भयानक आणि आक्रमक हावभाव असलेल्या भडक रंगात रंगवलेल्या, हिंसाचाराचे दर्शन घडविणाऱ्या आणि पिस्तुले, बंदुका, चाकू, रामपुरी चाकू व भाले इत्यादींसारख्या प्राणघातक शस्त्रांची चित्रे असलेल्या जाहिराती, मासिके, दैनिके यांमधून सर्रास आढळतात. विशेषतः व्यावसायिक दृष्टीकोनातून केवळ नफ्याकडे डोळा ठेवून प्रदर्शित केल्या जाणाऱ्या जाहिरात-फलकांवर या गोष्टी प्रामुख्याने आढळतात, परिणामी, हिंसाचाराबद्दल घृणा, तिरस्कार किंवा भय वाटण्याऐवजी लोकांमध्ये त्याबद्दल उत्सुकता किंवा आकर्षण वाढू लागले आहे. अनुचित व अश्लील प्रकारांनी केल्या जाणाऱ्या या व्यावसायिक जाहिराती आणि प्रसार माध्यमातून हिंसाचाराला मिळत असणारी प्रतिष्ठा यामुळे लहान मुलांची आणि कोवळ्या तरुणांची अभिरूची बिघडत चालली आहे. तसेच, निव्वळ पैसा मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवून आपल्या उत्पादनांची येनकेनप्रकारे जाहिरातबाजी करणाऱ्यांनी, आपल्या उत्पादनाशी अर्थाअर्थी काहीही संबंध नसताना प्रत्येक जाहिरातीत स्त्री-देहाचे भडक प्रदर्शन मांडून तरुणांच्या भावना उद्दिपित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालवला आहे. त्यामुळे खून, हल्ले, दरोडे, दंगली यांसारख्या लैंगिक अपराधांचे प्रमाणही बरेच वाढले आहे. चित्रपटातून व दूरदर्शनवर होणारे अशा प्रकारच्या चित्रांचे प्रदर्शन हे एकवेळ तातुरते आणि मर्यादित प्रक्षकवर्गापुरते असू शकेल. परंतु, जाहिरातींद्वारे होणारे क्रूर व बीभत्स चित्रांचे प्रदर्शन लोकांच्या नजरेसमोर सातत्याने आणि ठळकपणे येत राहिल्याने त्याचे परिणाम अधिक विघातक व गंभीर स्वरूपाचे होतात आणि त्यामुळे हिंस्त्र व लैंगिक अपराधांना व अत्याचारांना प्रोत्साहन मिळते. ही गोष्ट जशी नागरी जीवनात आढळते तसेच ग्रामीण जीवनही यांच्या प्रभावापासून दूर राहू शकत नाही.

म्हणून समाजातील गुन्हेगारी वृत्तीला आळा घालण्यासाठी नियतकालिकांमध्ये आणि जाहिरातफलकांवर हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणारी चित्रे प्रदर्शित करण्यास ताबडतोब बंदी घालणे आवश्यक आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ५ मार्च, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## सोपविलेल्या वैधानिक अधिकारांसंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधनिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :–

**खंड १(३) .–** या खंडाद्वारे, हा अधिनियम, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**खंड ५. .–** या खंडाद्वारे, राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ७ मार्च, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.